गोपमेळा

किती काळ गेला, अश्या संवत्सराला
बहु वेळ गेला, न गोपमेळा केला
असा चालुनिया अन, मग योग आला
सार्‍या मित्र-मैत्रिणींचा, पुन्हा मेळ केला ॥१॥

सुखाचे आगर कधी, दु:ख व्यथा जीवनाला
एकलेच सोसलेले कधी, कुणी सोबतीला
या भेटीत गाठ आता, पडे निश्चयाला
सुख दु:खात आता, न वाव एकलेपणाला ॥२॥

उद्दिष्ट: रस्ते सार्‍यांचे, जरी भिन्न दिशेला
कारणे अनेक घडली असतील, न भेटण्याला
तफावतहि कदाचित, असेल विचाराला
परी गंध मैत्रीचा, अजुनी चिब ओला ॥३॥

गत स्मृतींचा असा, जाह्ला गलबला
समय भेटण्याचा वाटे, क्षणात सरला
पुन्हा भेटण्याचा करार, शब्द झाला
असा जीवनी या, मैत्र-श्रावण रंगलेला ॥४॥

© सचिन पु. कुलकर्णी
www.saarthbodh.com
FB ID- sachin.kulkarni78